स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड

मानव्य विद्याशाखे अंतर्गत मराठी विषयातील पीएच.डी. (विद्यावाचस्पती)पदवीसाठी सादर करावयाचा शोधप्रबंधाचा आराखडा

‘अनुराधा पाटील यांच्या कविता: एक चिकित्सकअभ्यास’

संशोधक

शिवकन्या दगडोजी लांगे
नांदेड

मार्गदर्शक

डॉ. विलास शेषराव पाटील
प्रोफेसर,संशोधन मार्गदर्शक आणि मराठी विभागप्रमुख
ज्ञानोपासक महाविद्यालय,जिंतूर ४३१५०९ जि. परभणी

संशोधन केंद्र :- भाषा,वाङ्मय व संस्कृती अभ्यास संकुल

डिसेंबर २०२४

अनुक्रमाणिका

अ.क्र.	तपशील	पृ.क्र.
१	प्रस्तावना	3
२	संशोधनाची गरज	4
३	संशोधनाची व्याप्ती	4
४	संशोधनाची मर्यादा	5
५	गृहीतके	5
६	महत्त्व	6
७	साधने	6
८	संशोधन पद्धती	7
९	उद्देश आणि हेतू	7
१०	निष्कर्ष	8
११	प्रकरण रचना	8
१२	परिशिष्टे	9

प्रस्तावना :-

मराठी साहित्यात कथा,कादंबरी,कविता,चरित्र,आत्मचरित्र,निबंध इ. वाङ्मयप्रकारांचा समावेश होतो.यातील कविता हा वाङ्मयप्रकार प्राचीन काळापासून महत्त्वाचा असा वाङ्मय प्रकार आहे.मराठी वाङ्मयेतिहासात या वाङ्मयप्रकाराला मोठी परंपरा आहे.संतकाव्य,पंतकाव्य,तंतकाव्य ही फार मोठी परंपरा प्रयोगशील व दर्जेदार लेखनामुळे अधिक समृद्ध व विकसित झाली आहे.प्राचीन साहित्याच्या अंतरंगात व बहिरंगात पूर्णपणे बदल होऊन इ.स. १८७४ नंतर अर्वाचीन काव्याला सुरुवात झाली. मराठी काव्याची प्रेरणा व प्रयोजन यात आमुलाग्र बदल झाला. अर्वाचीन काळात मराठी कवितेचा चेहरा-मोहराच बदलला याचे कारण इंग्रजी राजवटीचा परिणाम होय.मराठी काव्यात केशवसुतांनी मोठी क्रांती घडवून आणली. म्हणून त्यांना आधुनिक मराठी कवितेचे जनक म्हणतात.

केशवसुतांपासून सुरू झालेली सौंदर्यवादी भावकवितेची परंपरा आणि मर्ढेकरांपासून सुरू झालेली आधुनिकतावादी कवितेची परंपरा यांच्यातील गुंतागुंतीचे द्वैत हा आधुनिक मराठी कवितेचा गाभा आहे.या द्वैतात सापडलेले आधुनिक कवी हा पेच आपापल्या परीने सोडविण्याचा प्रयत्न करतांना दिसतात. केशवसुतांपासून सुरू झालेल्या सौंदर्यवादी भावकवितेच्या परंपरेने पहिली जवळ जवळ पन्नास वर्षे आधुनिक मराठी कवितेवर अधिराज्य गाजवले.ही इंग्रजी वळणाची परंपरा होती.१९७० नंतरच्या कालखंडातील अनुराधा पाटील ह्या महत्त्वाच्या कवयित्री आहेत.आधुनिक मराठी काव्य परंपरेत आपला वेगळा ठसा त्यांनी उमटविला आहे. त्यांचे

‘दिगंत’(१९८१), ‘तरीही’(१९८५), ‘दिवसेंदिवस’(१९९२), ‘वाळूच्या पात्रात मांडलेला खेळ'(२००५), ‘कदाचित अजूनही’(२०१७) आणि ‘आता वहया सगळ्या बुडीत खाती'(२०२२) असे सहा काव्यसंग्रह प्रकाशित झाले आहेत. एक प्रौढ, समंजस आणि सुजाण व्यक्तिमत्वाशी आपला संवाद होतो आहे असा अनुभव त्यांची कविता वाचताना वाचकाला येतो.

एकूणच त्यांच्या कवितांमधून ग्रामीण समाज, राजकीय व सामाजिक बदल तसेच स्त्री-जाणीव ई. वास्तवतेचे चित्रण आले आहे.त्यामुळे बदलत्या वास्तवतेचे बरे-वाईट परिणाम शोधणे व त्यांचा अभ्यास करणे गरजेचे ठरते.

संशोधनाची गरज :-

१९७० नंतरच्या काव्य परंपरेतील महत्त्वाच्या कवयित्री अनुराधा पाटील यांच्या कवितेचा चिकित्सक अभ्यास करणे संशोधकाला महत्त्वाचे वाटते.आणि ही माझ्या अभ्यासाची व संशोधनाची गरज आहे.स्त्री-संवेदनेचे विविध पदर उलगडविणारा आणि सांस्कृतिक संचिताचा वेधक असा अविष्कार त्यांच्या कवितेत पहायला मिळतो.समाज जीवनातील नीती,परंपरा,मूल्ये,जीवन, माणूसपण अभ्यासणे आणि समाज जीवनाची जपवणूक संवर्धन करणे यासाठी प्रस्तुत संशोधनाची गरज आहे.

संशोधनाची व्याप्ती :-

कवयित्री अनुराधा पाटील यांच्या कवितांचा भारतीय संस्कृतीच्या दृष्टिकोनातून अभ्यास करणे ही या संशोधनाची व्याप्ती आहे ‘दिगंत’,‘तरीही’, ‘दिवसेंदिवस, ‘वाळूच्या

पात्रात मांडलेला खेळ', 'कदाचित अजूनही'आणि 'आता वहया सगळ्या बुडीत खाती' ई. कवितासंग्रहांचा आधार घेऊन मी संशोधन करणार आहे.

संशोधनाची मर्यादा :-

अनुराधा पाटील यांच्या प्रकाशित कवितांचा सर्वांगीण अभ्यास प्रस्तुत संशोधनात अंतर्भूत आहे.त्यांनी लिहिलेल्या आणि प्रकाशित झालेल्या कविता तसेच त्यांनी लिहिलेल्या साहित्यासंदर्भातील लेख,मुलाखती या संशोधनासाठी लिखित सामग्री असेल.त्यांच्या कवितासंग्रहावरील टीकालेखांचा अभ्यास करून योग्य त्या ठिकाणी निर्देश व नोंद केल्या जाईल.याव्यतिरिक्त दुसऱ्या कोणत्याही विषयाचा अभ्यास अपेक्षित नाही.

गृहीतके :-

- कवयित्री अनुराधा पाटील यांच्या काव्यसंग्रहामागील पार्श्वभूमी उजागर करणे.
- त्यांच्या काव्यसंग्रहातून वास्तवांचा शोध घेणे.
- त्यांच्या लेखनातील वेगळेपण व काव्याकडे बघण्याचा दृष्टिकोन तपासणे.
- त्यांच्या लेखनातील भाषाशैलीचा अभ्यास करणे.
- त्यांच्या काव्यातून येणारे समाजजीवन व व्यक्त होणारे दुःख तसेच होणारे शोषण यांचा अभ्यास करणे.

महत्त्व :-

ग्रामीण जीवनातील सामाजिक,सांस्कृतिक,राजकीय आणि आर्थिक बदलाचे खेड्यापाड्यावरील,स्त्री-पुरुष,पशुपक्षी आणि प्राणी यांच्यावरील परिणाम अधोरेखित करणे.अनुराधा पाटील यांच्या कवितेतून व्यक्त होणारी सामाजिक जाणीव ही मराठीतील अन्य कवितेसारखी नाही.ही कविता भौतिक व सामाजिक अवकाशाच्या दाबातून निर्माण झालेली आहे. त्यांच्या कवितेत राजकीय जाणिवांचा एक स्पष्ट असा व्यूह जाणवतो.सामाजिक,राजकीय पर्यावरणातून उद्भवलेले अंतर्विरोध आणि पेच या कवितेतून व्यक्त झाले आहेत. यासाठी या संशोधनाचे महत्त्व आहे. भारतीय राजकारणातील विपरीतपण एकरंगी राष्ट्रवाद या कवितेतून व्यक्त झाला आहे. बाजारीकरण आणि शोषणासह कितीतरी नवे संदर्भ त्यांच्या कवितेत आहेत. करुणा,दुःख,समग्र माणूसपणाची घुसमट अनुराधा पाटील यांच्या कवितेतून व्यक्त होते.बदलत्या समाज जीवनाचे वास्तव जाणून घेण्यासाठी हे संशोधन व्हावे असे संशोधकाला वाटते.

साधने :-

- प्रस्तुत संशोधनासाठी कवयित्री अनुराधा पाटील यांच्या कविता संग्रहांचा आधारभूत साधन म्हणून वापर करण्यात येईल.

- त्यांच्या कवितासंग्रहवरील टीकालेखांचा अभ्यास करून योग्य त्या ठिकाणी निर्देश करून मांडणी केली जाईल.

संशोधन पद्धती :-

कवयित्री अनुराधा पाटील यांच्या काव्यसंग्रहांचा अभ्यास करीत असताना अभ्यासातील प्राथमिक व दुय्यम स्रोतांचा योग्यपणे वापर करण्यात येईल. त्याचप्रमाणे विश्लेषण,ऐतिहासिक संशोधन पद्धती व प्रसंगी इंटरनेटवर साहित्याचा वापर करण्यात येईल.

उद्देश आणि हेतू :-

- मराठी कवितेच्या प्रेरणा व विकासात कवयित्री अनुराधा पाटील यांचा सहभाग उलगडून दाखविणे.
- एक समर्थ कवयित्री,कथाकार आणि अनुवादक म्हणून अनुराधा पाटील यांच्या काव्याचा अभ्यास करणे.
- १९६० नंतरच्या कवितेच्या इतिहासात अनुराधा पाटील यांचे कवयित्री म्हणून स्थान निश्चित करणे.

- त्यांच्या कवितेतून त्यांची वैचारिक भूमीका समजून घेणे आणि त्यांच्या कवितेचा प्रवास उलगडून दाखविणे.
- अनुराधा पाटील यांच्या कवितासंग्रहातील कवितांची भाषाशैली आणि बोलीभाषेतील शब्दांचे महत्त्व निर्देशित करणे व त्यांच्या संग्रहांचे वाङ्मयीन मूल्य समजून घेणे हा संशोधकाचा हेतू आहे.

निष्कर्ष :-

प्रस्तुत संशोधनाद्वारे मराठी कवितेचे स्वरूप अभ्यासल्यानंतर या कवयित्रीमध्ये प्रायोगिकता पहायला मिळते.त्यांच्या कवितांचा काळ,संस्कृती आणि परिवर्तन या अंगाने अभ्यास करताना मानवी समाजजीवनाचे वास्तव दृगोचर होईल. त्यांच्या कवितेची वैशिष्ट्ये,निष्कर्ष नोंदवता येतील.त्यांचे जीवन,काव्यासंबंधी भूमिका आणि कवितेतील बोलीभाषेचा अभ्यास करता येईल.

प्रकरण रचना

प्रकरण १ ले उपोद्घात

प्रस्तुत प्रकरणात अभ्यास विषयाची प्रस्तावना संशोधनाचे महत्त्व व्याप्ती मर्यादा आणि उद्देश स्पष्ट केल्या जाईल.

प्रकरण २ रे   कविता: घटक,तंत्र आणि प्रकार

या प्रकरणात कवितेचे घटक,तंत्र आणि प्रकार यांचा अभ्यास केल्या जाईल.

प्रकरण ३ रे   इ.स.१९८० नंतरची कविता

सदर प्रकरणात इ.स. १९८० नंतरच्या मराठी कवितेचा आढावा संशोधक घेणार आहे.

प्रकरण ४ थे   अनुराधा पाटील यांचे जीवन आण साहित्य

प्रस्तुत प्रकरणात अनुराधा पाटील यांचे जीवन, त्यांची वाङ्मयीन जडणघडण आणि प्रकाशित साहित्य या सर्व बाबींचा उहापोह केल्या जाईल.

प्रकरण ५ वे अनुराधा पाटील यांच्या कवितेचे स्वरूप

या प्रकरणात अनुराधा पाटील यांच्या सहाही काव्यसंग्रहातील कवितांचा सर्वांगीण अभ्यास संशोधक करणार आहे.त्याचप्रमाणे त्यांच्या कवितेचे स्वरूप जाणून घेणार आहे

प्रकरण ६ वे अनुराधा पाटील यांच्या कवितेची वाङ्मयीन चिकित्सा आणि भाषाशैली

या प्रकरणात अनुराधा पाटील यांच्या कवितांचे वाङ्मयीन मूल्यमापन तसेच भाषाशैलीच्या अंगाने अभ्यास संशोधक करणार आहे.बोलीभाषेतील शब्दांना त्यांच्या कवितेत मिळालेले स्थान अधोरेखित करून,ग्रामीण म्हणी,भाषा,संस्कृती यांचा भाषाशास्त्रीय अभ्यास संशोधक करणार आहे.

प्रकरण ७ वे   उपसंहार

अनुराधा पाटील यांच्या कवितांचा अभ्यास केल्यानंतर हाती आलेल्या निष्कर्षांची क्रमवार नोंद या समारोपीय प्रकरणात मी घेणार आहे.

परिशिष्टे :-

- अनुराधा पाटील यांचे प्रकाशित साहित्य
- संदर्भग्रंथ सूची

अनुराधा पाटील यांची एकूण कविता लक्षात घेता त्या मराठी सारस्वताच्या वळणावरील एक प्रमुख टप्पा आहेत हे लक्षात येते.कवयित्री म्हणून अनुराधा पाटील यांची झालेली जडणघडण,त्यांचे जगणे आणि कवितेसंबंधी विचार,भूमिका आणि मतमतांतरे यातून त्यांचे समीक्षेच्या अंगाने व्यक्तिमत्त्व शब्दांकित करणे.आणि त्यांच्या काव्याचे वेगळेपण सर्वांगांनी उकलून दाखविणे हा प्रस्तुत संशोधकाचा मानस आहे.

मार्गदर्शक	संशोधक
डॉ. विलास पाटील	शिवकन्या दगडोजी लांगे

संदर्भग्रंथ :-

१) पाटील, अनुराधा :- 'दिगंत', कुशा प्रकाशन, औरंगाबाद

२) पाटील, अनुराधा :- 'तरीही',कुशा प्रकाशन, औरंगाबाद

३) पाटील, अनुराधा :- 'दिवसेंदिवस',कुशा प्रकाशन, औरंगाबाद

४) पाटील, अनुराधा :- 'वाळूच्या पात्रात मांडलेला खेळ', तुला प्रकाशन,औरंगाबाद

५) पाटील, अनुराधा :- 'कदाचित अजूनही', शब्द पब्लिकेशन, मुंबई

६) पाटील, अनुराधा :- 'आता वह्या सगळ्या बुडीत खाती', शब्द पब्लिकेशन, मुंबई

७) कोत्तापल्ले, नागनाथ :- 'मराठी कविता: आकलन आणि आस्वाद', स्वरूप प्रकाशन,औरंगाबाद

८) जाधव, रा.ग. :- 'साठोत्तरी मराठी कविता व कवी', साकेत प्रकाशन,औरंगाबाद

९) भृगुवार, डॉ.सुरेश :- 'वाङ्मयीन शैली: तरंग-अंतरंग', दिलीपराज प्रकाशन,पुणे

१०) रसाळ, सुधीर :- 'कविता आणि प्रतिमा', मौज प्रकाशन गृह,मुंबई

११) केजकर, प्रकाश :- 'आधुनिक मराठी कविता: एक विश्लेषण',स्वरूप प्रकाशन,औरंगाबाद

१२) चिडगोपकर, डॉ. अलका :- 'अर्वाचीन मराठी कवयित्री', स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, पुणे

१३) संपा; कुलकर्णी,ऋतूपर्ण आणि कुलकर्णी देवयानी :- 'प्रदक्षिणा-खंड पहिला',कॉन्टिनेन्टल प्रकाशन,पुणे

१४) संपा; कुलकर्णी,ऋतूपर्ण आणि कुलकर्णी देवयानी :- ‘प्रदक्षिणा’-खंड दुसरा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन,पुणे

१५) संपा; मंचरकर, डॉ.र.बा. :- ‘सामाजिक परिवर्तन आणि मराठी साहित्य’, पद्‌मगंधा प्रकाशन,पुणे

१६) बोरकर, डॉ.सुनंदा :- ‘अनुराधा पाटील यांच्या कवितेचे स्त्रीवादी आकलन', ऋचा पब्लिकेशन,नागपूर